# वसई-विरार शहर महानगरपालिका

## मालमत्ता कर विभाग

**प्रेस नोट**

खुश खबर! खुश खबर! खुश खबर!!!

वसई विरार शहर महानगर पालिका हद्दीतील मालमत्ता धारकांसाठी खुश खबर! जे मालमत्ता धारक ३० सप्टेंबर २०२५ रोजी पर्यंत संपूर्ण मालमत्ता कराचा भरणा करतील त्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत कराधन नियम प्रकरण ८ मधील नियम क्र. ४१ नुसार लावण्यात आलेल्या शास्ती मध्ये ५०% सवलत मा. आयुक्त महोदय यांनी जाहीर केली आहे! त्वरा करा आणि कर भरणा करून शास्तीच्या रक्कमेतून ५०% सूटचा लाभ घ्या असे आवाहन मा. आयुक्त श्री. मनोजकुमार सूर्यवंशी यांनी मालमत्ता धारकांना केलेले आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार "**अभय योजना २०२५-२६**" राबविण्यात येत आहे सदर योजनेचा तपशील पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

**कालावधी :** २० ऑगस्ट २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५

**व्याप्ती :** महानगरपालिका क्षेत्रातील सर्व निवासी, वाणिज्य, औद्योगिक व मोबाईल मनोरे मालमत्ता धारकांसाठी लागू.

**सवलत :** या कालावधीत मालमत्ता कर व इतर करासह ५०% शास्ती (नियम ४१ अन्वये) रक्कम भरल्यास उर्वरित ५०% शास्ती माफ करण्यात येईल.

**अटी:**

- मालमत्ता धारकाने आपला मालमत्ता कर व इतर करासह ५०% शास्ती एक रक्कमी भरणा करावी.
- प्रलंबित अपील/दावे विना अट मागे घ्यावे लागतील.
- दिलेला धनादेश न वटल्यास योजना लागू राहणार नाही.
- योजना कालावधी नंतर कर भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकांना अभय योजना अंतर्गत सवलतीचा लाभ घेता येणार नाही.

नागरिकांनी या योजनेचा लाभ घेऊन मालमत्ता कर थकबाकी त्वरीत भरावी, असे आवाहन वसई-विरार शहर महानगरपालिका याद्वारे करीत आहे.

सही/-
(दीपक झिंजाड)
उपायुक्त,
मालमत्ता कर विभाग
वसई-विरार शहर महानगरपालिका